ज्या सभासद, हितचिंतकांना संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी सोबत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून आपली देणगी संस्थेच्या खात्यात जमा करू शकतात. देणगीचे स्वरूप, देणगीदाराचे नाव व ट्रान्सफर केल्याचा स्क्रिनशॉट संस्थेच्या व्हॉट्सॲप नंबरवर पाठवणे अनिवार्य आहे. तसेच ज्या सभासदांना 'देशस्थ ऋग्वेदी पत्रिका' अंक दरमहा पोहोचत नसेल त्यांनी आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्त्याची नोंद संस्था कार्यालयात करावी.

## आधार / शैक्षणिक निधी

१) श्री. दत्तात्रय पांडुरंग कुलकर्णी यांचेकडून क्रीडाक्षेत्र प्राविण्यासाठी पारितोषिक निधी रु. १०,०००/-

२) श्री. आर. व्ही. कुलकर्णी (नैताळकर) सार्वजनिक विश्वस्तनिधी यांचेकडून शैक्षणिक निधी रु. ६०००/-

३) श्री. उमेश सुरेश कुलकर्णी यांचेकडून वडील कै. श्री. सुरेश यशवंत कुलकर्णी यांचे स्मरणार्थ आधारनिधी रु. १५००/-

४) श्री. विजय लक्ष्मण कुलकर्णी यांचेकडून आधारनिधी रु. ११००/-

५) श्री. अशोक पंडीतराव कुलकर्णी यांचेकडून वडील कै. श्री. पंडीतराव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ आधारनिधी रु. १००१/-

६) सौ. स्वाती व श्री. दत्तात्रय चौधरी यांचेकडून कै. श्री. म. पळशीकर यांचे स्मरणार्थ आधारनिधी रु. १००१/-

७) श्री. बाळासाहेब कुलकर्णी यांचेकडून कै. श्रीमती दुर्गाबाई हरिभाऊ कुलकर्णी यांचे पुण्यतिथी (रथसप्तमी) निमित्त आधारनिधी रु. १००१/-

८) सौ. संध्या नरेंद्र कुलकर्णी यांचेकडून वडील कै. श्री. रामचंद्र भाऊराव जालिहालकर यांचे स्मरणार्थ आधारनिधी रु. ५०१/-

९) श्री. स्वप्नील अविनाश कुलकर्णी यांचेकडून कै. उषा महादेव कुलकर्णी यांचे स्मरणार्थ शैक्षणिक निधी रु. २०१/-

१०) श्री. प्रदीप अडावदकर यांचेकडून बहिण कै. नीला रमेश देशपांडे यांचे स्मृतीप्रित्यर्थ आधारनिधी रु. १०१/-

११) भावना जोशी यांचेकडून कै. श्री. प्रसाद कुलकर्णी यांचे स्मरणार्थ आधारनिधी रु. ५१/-


**देशस्थ ऋग्वेदी संलग्न संस्थांनी आपआपल्या भागातील वृत्त ऋग्वेद पत्रिकेत प्रसिद्धीसाठी द्यावयाचे असल्यास दर महिन्याच्या २८ तारखेपर्यंत संस्था कार्यालयात पाठवावे.**

### अत्यंत महत्त्वाचे

**देशस्थ ऋग्वेदी पत्रिकेत नोंदणी केलेल्या उपवर मुलामुलींचे लग्न ठरले / झाले त्यांनी कृपया त्वरित संस्थेत कळवावे.**

## विवाह ठरले/झाले — अभिनंदन! वैवाहिक आयुष्यास शुभेच्छा!!

| | | |
|---|---|---|
| ऋषिकेश त्रिविक्रम गोहाड | अमृता देशपांडे | हर्षल उदय जहागीरदार |
| समृद्धी नितीन कुलकर्णी | सोनाली मुकुंद कोरान्ने | दिपाली विलास मुळे |
| विशाल मोहन देशपांडे | नीरज नरेंद्र जोशी | संदीप प्रमोद जोशी |
| भरत शेखर कुलकर्णी | स्नेहल संजय देशपांडे | तन्वी अरविंद देशपांडे |
| सर्वेश दत्तात्रय चौधरी | अनघा विनायक देशपांडे | पुजा गुरूप्रसाद देशपांडे |



पदमाकर देशपांडे

# श्रीदत्त महात्म्य

## द्वितीयोध्याय

श्री दत्त समर्थ. साष्टांग नमस्कार करून दीपकाने गुरूंना प्रश्न केला, गुरुजी माझ्या मनाचे समाधान करावे. कोणी म्हणतात दत्तात्रय हा ऋषीचा पुत्र आहे, कोणी म्हणतात देव आहे, कोणी म्हणतात, त्याचे ध्यान करावे. श्री दत्त हा परब्रह्म मूर्ती आहे असेही कोणी बोलतात. त्यामुळे माझी बुद्धी भ्रमित होते. नेमके सत्य काय? ते मला सांगा. कोणत्या कारणामुळे त्याने अवतार घेतला? त्याने इथे कोणत्या लीला केल्या? शिष्यसंग्रह कशाप्रकारे केला? हे सर्व मला ऐकवा.

शिष्याचा प्रश्न ऐकून गुरुचे मन सद्‌गदित झाले. ते म्हणाले, ''हे शिष्य! तू सावधान हो! कान इकडे करून ऐक.'' ''एक भार्गव कुलात उत्पन्न झालेला उत्तम ब्राह्मण होता. त्याने नवस केल्याने वृद्धपणी त्याला पुत्र झाला. तो सर्वज्ञ; मात्र योगभ्रष्ट होता, पण सुज्ञ असूनही मूढासारखा वागत असे. त्याचा पिता ब्राह्मण आणि चांगला शिकलेला होता. तो त्याला शिकवण्याचा प्रयत्न करीत होता. त्याची मुंज करून पिता त्याला शिकवायचा प्रयत्न करीत होता.''

त्यावर हसून तो मुलगा म्हणाला, ''तुमचा हा प्रयत्न कशासाठी आहे?'' पिता म्हणाला, ''गृहस्थाश्रम करून मोक्षासाठी कर्माचे आचरण करावे आणि त्याद्वारे निर्वाण प्राप्त करावे म्हणून माझा हा प्रयत्न आहे.''

त्यावर तो पुत्र म्हणाला, '' तात ऐका, मी वेदादिक शिकलो. सगळी कर्मे केली. अनेक भोग भोगले. मंत्री झालो. राजा झालो, प्रजेचा भर्ता झालो. उत्तम अधम अशा ज्या योनी आहेत त्या-त्या सर्व अनुभवल्या. ते मला स्पष्टपणे आठवतं. मी पूर्वीचा योगभ्रष्ट आहे. आता मला कोणतेही कर्तव्य शिल्लक राहिलेले नाही.'' ''तू हे कष्ट कशासाठी करतोस? मला जन्मतःच सर्व बोध झालेला आहे. आता कर्मांचा खेळ नको. मनाचा मळ झाडून मी वैराग्य प्राप्त केलेले आहे. पूर्वी मी ब्राह्मण होतो. सत्संग करून, विद्याभ्यास करून वैराग्य संपादन केले. एकाग्र मन करून मी ध्यान केले. ज्ञानाला प्रतिबंध येऊन अकस्मात माझं मरण झालं. मात्र पूर्वाभ्यासाचं विस्मरण मला झालेलं नाही. ज्याप्रमाणे झोपलेले असताना विद्या विसरली जाते आणि जागे झाल्यावर ते सर्व आठवतं त्याप्रमाणे जन्म प्राप्त होताच सर्व अभ्यास मला व्यवस्थित आठवत आहे. मी तीनही भूमीवरून फिरलो, तोही अभ्यास विसरलेलो नाही.''

''मी परमेश्वराची आदराने सेवा केली, तेही सगळं आठवतं. आता मला उपरती झालेली आहे. परमशांती मिळालेली आहे. विरक्ती दृढ झालेली आहे. आता पुनरावृत्ती म्हणजे पुनर्जन्म कसा असेल? करायचं ते ध्यान मी केलं. मिळवायचं ते मी मिळवलं आता काहीही राहिलं नाही. तुझ्यामुळे मला यथार्थ सगळं लक्षात आलं.''


पुत्राचं वचन ऐकून पित्याला वैराग्य प्राप्त झाले. मग तो दीन होऊन म्हणाला, ''तू धन्य धन्य आहेस. तू कुळ पावन केले आहे. पूर्वजांचा तो उद्धार केलेला आहे. आता माझं वचन ऐक. ''तुझं जे ज्ञान आहे ते मला सांग. मी संसाराला भिऊन, वैराग्य सहित अनुभवाचे ज्ञान जाणू इच्छितो. तू मला वडील म्हणत असला तरी देखील मी अज्ञानी आहे. मी ज्ञानासाठी तुझा मुलगा होईन. हे वेदांना संमत आहे.''

यावर पुत्र म्हणाला ऐका, ''श्री दत्ताने अर्जुनाला उपदेश केला. त्याला योगाभ्यासामुळे ज्ञान प्राप्त झाले तसा प्रयत्न तुम्ही करा.

पिता म्हणाला, ''कोण श्रीदत्त? अर्जुन हा कोणाचा मुलगा? त्याला कसं ज्ञान प्राप्त झालं? हे सर्व सांगावं.

पुत्र म्हणाला, ''योगायोगाने दुःख वाट्याला येते. त्याचा जो वियोग करतो त्यालाच योग म्हणतात. तो दत्ताने समग्र सांगितला, हे सर्व निरूपण मी करीन. ते सावध होऊन ऐक. प्रतिष्ठानमध्ये म्हणजे पैठणमध्ये कौशिक गोत्री ब्राह्मण राहत होता. दैवयोगाने तो व्यसनाच्या आधीन होऊन नेहमी वेश्येच्या घरी राहू लागला. रोज भोग भोगल्याने त्याला कुष्ठरोग झाला, त्यामुळे तो त्रस्त झाला. त्याचं ते बीभत्स रूप पाहून वेश्येने त्याला हाकलले. तेव्हा त्याला आपल्या पत्नीची आठवण होऊन तो ब्राह्मण स्वतःच्या घरी आला. लोकराहाटीनुसार पती अचानक घरी आल्यावर त्याच्या पत्नीने त्याच्या पायाला मिठी घातली. ती सती सावित्रीसारखी पवित्र होती. ती म्हणाली, ''आज चांगला दिवस उगवला. जणू काही सोन्याचा पाऊस झालेला आहे. इष्ट देवांचं दर्शन झालं आहे.''

(क्रमशः)



# मनाच्या श्लोकांचे महत्त्व

सौ. थोरवी जहागीरदार पर्वतीकर, कल्याण

**गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा ।**
**मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा ।।**
**नमुं शारदा मूळ चत्वार वाचा ।**
**गमू पंथ आनंत या राघवाचा ।।**

श्री समर्थांनी मनाचे श्लोक केव्हा रचले? तो प्रसंग असा श्री समर्थांनी चाफळास सुरू केलेला उत्सव काही वर्षे चालला. उत्सवात शिवाजीराजांकडून धान्य येऊ लागले अर्थात शिष्यांची रामदाता ही निष्ठा व भिक्षा कामधेनूवरील श्रद्धा दोन्ही मंदावली. एका वर्षी नोकरशाहीच्या गफलतीमुळे राजाकडून धान्य आले नाही. उत्सव कसा पार पडणार, एवढ्या मंडळींना खाऊ कसे घालायचे, या चिंतेने शिष्य मंडळी श्री समर्थांभोवती गोळा झाली. श्री समर्थ म्हणाले, ''ज्याचा उत्सव आहे, तोच त्याचा कर्ता पण आहे. तो नीट पार पाडील, कोणी चिंता करू नये.'' उत्सव सुरू होण्यास आठ दिवस उरले. रात्री सर्वत्र निजानीज झाल्यावर श्री समर्थांनी कल्याणांना हाक मारली आणि 'गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा' असा आरंभ करून दोनशे पाच श्लोक एका बैठकीत निवेदन केले. सकाळी कल्याणांनी शिष्यांकडून त्या श्लोकांच्या प्रति करवल्या. प्रति घेऊन शिष्य आसपासच्या गावात गेले. प्रत्येक घरासमोर उभे राहून एक श्लोक म्हणायचा व 'जय जय रघुवीर समर्थ' असा घोष करायचा. जी भिक्षा येईल ती घ्यायची व पुढे चालायचे. खड्या आवाजात म्हटलेल्या नव्या श्लोकांचा एवढा परिणाम झाला की, आठ दिवसात अक्षरशः गाड्या भरून धान्य आले आणि उत्सव उत्तमरितीने पार पडला.

श्री समर्थांनी श्रीरामावर प्रेम केले. त्याचे अखंड नाम जपले व पवित्र झाले. तेव्हा श्री रामरायाच्या कृपेने त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. त्या साक्षात्कारातून त्यांना परमानंद मिळाला. तो आनंद सर्वांना भोगायला मिळावा, अशी तळमळ त्यांना लागली. आनंदाचा अनुभव घेणारे मन कसे तयार करावे हे समजून सांगण्यासाठी त्यांनी मनाचे श्लोक रचले.

संस्कृत वाङ्मयात अध्यात्मदृष्टीने उपनिषदांचे जे स्थान तेच प्राकृत वाङ्मयात मनाचे श्लोकाचे आहे. मनाचे श्लोक ही सुक्तेच आहेत. श्रीसमर्थांनी मनाला बोध केला आहे. खरेच आहे मन वळले तरच कोणताही कार्यभाग होईल, हे समर्थांना पुरते ठाऊक होते. त्यांना साधकाला अभ्यासाला प्रवृत्त करून परमार्थ प्राप्तीकरिता अचूक मार्गदर्शन करावयाचे होते, ते त्यांनी मनाचे योग्य स्वरूप साधकाना दाखवून केले आहे.

**मना रे जनी मौन्य मुद्रा धरावी ।**
**कथा आदरे राघवांची करावी ।।**

हाच तो मार्ग आहे. मनाच्या प्रत्येक श्लोकात परमार्थ पथावर नेणेसाठी उपाय सांगितला आहे.

दासबोधामध्ये आणि अन्य प्रकरणांमध्ये श्री समर्थांनी एक स्वतंत्र जीवनदर्शन विस्ताराने मांडले. तेच जीवनदर्शन अत्यंत सुलभ पद्धतीने पण मुकुलित स्वरूपात यांनी मनाच्या श्लोकात सांगोपांग सांगितले. अध्यात्मसाधना करणाऱ्या कोणत्याही परंपरेतील साधकाला मनाचे श्लोक ही श्री समर्थांची बहुमोल मार्गदर्शिका आहे.

दृश्यात रमणाऱ्या व दृश्याचा शोध घेण्यात पटाईत असणाऱ्या मानवी मनाला आनंदरूप आत्म्याचा अनुभव येत नाही. स्वानंदाचा अनुभव येण्यासाठी त्या मनाचे शोधन करावे लागते. मनानेच मनाचे शोधन करून त्यास स्वानंद भोगण्यास पात्र करावे लागते. म्हणून श्री समर्थांनी मनालाच उपदेश केला. आपले मन विश्वमनाचाच अंश आहे, म्हणून आपल्या मनाने विश्वमनात विलीन होऊन ईश्वर दर्शनाचा आनंद भोगला पाहिजे. आपल्या देहबुद्धीची आपण आत्मबुद्धी करायला पाहिजे. देहबुद्धीमुळे स्वानंदाचा हक्क गमावून बसलो आहोत. गमावलेला आनंद परत मिळावा यासाठी आपले मन धडपड करते. पण देहाच्या नादाने त्याची कल्पना चुकते आणि दृश्य विकारी व विनाशी वस्तूंमध्ये ते आनंदाचा शोध करते. जेथे तो आनंद नाहीच नाही तेथे तो शोधीत रहाण्याचा वेडेपणा सोडून आपल्या मनाने तो भगवंतापाशीच शोधावा म्हणून श्रीसमर्थांनी मनाच्या श्लोकात त्या मनाची समजूत घातली आहे.

मनास उन्मन करण्याचा मार्ग मुख्यतः आतमधील आहे. सूक्ष्म आहे, त्यास 'अनंत राघवाचा पंथ' असे नाव देऊन मनाच्या श्लोकात श्री समर्थांनी तो सांगोपांग सांगितला. म्हणून मनाचे श्लोक म्हणजे एक उन्मनी अवस्था भोगणाऱ्या पुरुषाने आपल्या सभोवार वावरणाऱ्या अज्ञानी पुरुषांच्या मनाशी अतिशय आपले - पणाने केलेला सुखसंवाद होय.

श्रीसमर्थांचा भक्तिमार्ग अतिशय विवेकप्रधान असल्याने उपासकाने स्वस्वरूप व भगवत्स्वरूप जाणून उपासना करावी असा त्यांचा खाक्या दिसतो. येथे भोळे पणास व बावळटपणास स्थान नाही-मनाच्या प्रसन्नतेत जीवनाचे सार्थक स्वरूप साठवलेले आहे. ती प्रसन्नता मनाचे श्लोक देतील यात शंका नाही.

**दि. ११ फेब्रुवारी २०२६ दासनवमी निमित्त समर्थांना शतशः नमन!**

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

## मुलींची नावे

## वयोगट २२ ते ३६

**अर्पिता मोरेश्वर कळमकर**
२२, ५'२'', अत्रि, ऋग्वेदी, राक्षस, कर्क, आश्लेषा, अंत्य, चवथे, O+ve, शिक्षण : B.Com., MBA (Appear), अपेक्षा : अनुरुप, मासिक प्राप्ती १ लाखापर्यंत हवी, पत्ता : श्री. मोरेश्वर गोपाळ कळमकर, ९०, राममंदिराजवळ, पाचआळी, त्र्यंबकेश्वर, नाशिक-४२२२१२. मो. : ९४२२७६३३९२, ९९६०४५३४०९

**वेदश्री दीपकराव खडके**
२३, ५',५'', भारद्वाज, यजुर्वेद, निमगोरा, राक्षस, वृषभ, कृत्तिका, अंत्य, चवथे, O+ve, शिक्षण : D.Ed., B.A. चालू, नोकरी : रिवायडल इंग्लिश स्कूल, मा. प्रा. : ३०,०००/-, अपेक्षा : सुसंस्कृत, निर्व्यसनी, शाकाहारी, मनमिळाऊ, नोकरी/व्यवसाय चालेल. पत्ता : श्री. दीपक चंपराव खडके, एन-११, ई १०/८, मयुर नगर, संभाजीनगर-४३१००३. मो. : ९८२२२५१०१७.

**किरण रामचंद्र देव**
२४, ५',७'', अर्शेशन, यजुर्वेदी, गोरा, मनुष्य, धनू, उत्तराषाढा, अंत्य, पहिले, B+ve, शिक्षण : B.Com., CMA, नोकरी : ITC Ltd., मा. प्रा. : ७५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्रीमती मीरा रामचंद्र देव, घर नं. ४५३१, गल्ली नं. ८, नेहरू चौक, संभाजी दुध डेअरीमागे, देवपूर, धुळे-४२४००२. मो. : ९४२३९३५६९१, ९४२३९२५४८०

**जान्हवी आस्वाद भालेराव**
२४, ५',५'' काश्यप, ऋग्वेदी, सावळा, सौम्य मंगळ, मनुष्य, मेष, भरणी, मध्य, तिसरे, B-ve, शिक्षण : B.Sc. Aeronatics, AME, MBA (HR), नोकरी : HR Manager, Nashik. वा. प्रा. : ४ लाख. अपेक्षा : सुसंस्कृत, मनमिळाऊ, समजून घेणारा, एकत्र कुटुंब चालेल, सरकारी वा प्रायव्हेट कायम नोकरी, वयात अंतर ३-४ वर्षांचे. पत्ता : श्री. आस्वाद प्रकाश भालेराव, फ्लॅट क्र. १३, ऐश्वर्या हार्सट्स, दुर्गानगर, कामटवाडे रोड, नाशिक-४२२००८. मो. : ९८८११९८९०५, ९८८१७२८९०५

**रेणुका दीपक जोशी**
२४, ५',५'', वत्स, यजुर्वेदी, गोरा, चष्मा आहे, देव, मेष, अश्विनी, आद्य, चवथे, O+ve, शिक्षण : B.E. (Computer), नोकरी : Metro, Pune, मा.प्रा. : ३५,०००/-, अपेक्षा : उच्चशिक्षित, सरकारी नोकरी, निर्व्यसनी, पत्ता : श्री. दीपक नारायण जोशी, तेली समाज मंगल कार्यालयाजवळ, एम.जी. नगर, चाळीसगाव, जि. जळगाव. मो. : ९५१८३६३६९५

**दीपश्री दीपक प्रभुणे**
२४, ५', वसिष्ठ, ऋग्वेदी, गहू, मनुष्य, मीन, पूर्वा भाद्रपदा, आद्य, चवथे, AB+ve, शिक्षण : B.E. (Printing Technology & Packaging), नोकरी : As a QC Trainee, Private Job, मा. प्रा. : १८,०००/-, अपेक्षा : ब्राह्मण, निर्व्यसनी, उच्चशिक्षित, शाकाहारी, पुणे येथे कायम वास्तव्य, पत्ता : श्री. दीपक कृष्णाजी प्रभुणे, जी-७०१, 'श्रावण' ऋतुरंग गृह. संस्था (फेज-२), श्री अरण्येश्वर मंदिर मार्ग, पुणे - ४११००९. मो. : ९९८७०८४९२७, ९३२४९६३५१६

**शची प्रशांत घोटकर**
२५, ५',४'', वशिष्ठ, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, कर्क, आश्लेषा, अंत्य, चवथे, O-ve, शिक्षण : B.E. MBA, नोकरी : ICICI Prudential Life, Sr. Agency Manager, मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, सुटेबल, पत्ता : श्री. प्रशांत नीळकंठ घोटकर, प्लॉट नं. १६, स्टेट बँकेजवळ, साईमंदिरासमोर, साईनगर, अमरावती-४४४६०७. मो. : ९८२३७१०७७३

**वैदेही संजय भालेराव**
२५, ५'५'', भारद्वाज, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, वृश्चिक, ज्येष्ठा, आद्य, चवथे, B+ve, शिक्षण : B.E. (Mech.) SAP, व्यवसाय : Mechanical Engineer Ding work in SAP, pune TCS, वा. प्रा. : ५ लाख, अपेक्षा : Well Educated, Working in same Field as Engineer, respectful, पत्ता : श्री. संजय शामराव भालेराव, शामल निवास, दत्त मंदिराजवळ, देशपांडे लेन, वैजापूर, जि. छ. संभाजीनगर-४२३७०१. मो. : ९८५०७६८०९४, ८८०६१४३१८७

**वैदेही प्रशांत देशपांडे**
२५, ५'८'', कौंडिण्य, यजुर्वेदी, निमगोरा, मनुष्य, वृषभ, राहिणी, अंत्य, चवथे, B-ve, शिक्षण : BA (Psychology) MBA (HR), नोकरी : Pattern Technologies, Pune, मा. प्रा. : १,१०,०००/-, अपेक्षा : सुशिक्षित, नोकरी, व्यवसाय, निर्व्यसनी, पत्ता : श्री. प्रशांत जनार्दन देशपांडे, श्रेयस, निलमणी सोसायटीसमोर, राजीवनगर, नाशिक-४२२००९. मो. : ९७६५५५८६०१, ९७६५५५८६०२

**श्रद्धा संजय वाळवेकर**
२६, ५'२'', अगस्ती, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा, आद्य, तिसरे, A+ve, शिक्षण : BMS (Bachelor of Mgt. Studies), MBA (HR) DLLW (Dip. in Labour Law), नोकरी : नाशिक येथे Legit Hub Placement मध्ये ट्रेनिंग मध्ये आहे. मा. प्रा. : ४,०००/-, अपेक्षा : शुद्ध शाकाहारी, आर्थिक सुस्थिती, सेफ ड्रायव्हिंग, निर्व्यसनी, प्रामाणिक. वयात अंतर १-४ वर्षे, पत्ता : श्री. संजय नारायणराव वाळवेकर, फ्लॅट नं. ४०३, प्रणव रेसिडेन्सी, वावरे नगर, आयटीआय अंबड लिंक रोड, कामटवाडे, नाशिक. मो. : ८६०५३५७३४३, ९४२२२६४२११

**तन्मयी नितीन कुलकर्णी**
२६, ५', वशिष्ठ, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, विशाखा, अंत्य, चवथे, A+ve, शिक्षण : B.E. (Mechanical Appear in Master in International Management & Applied Science in Germany. नोकरी : नाही. सध्या जर्मनीत शिक्षण घेत आहे. अपेक्षा : उच्च शिक्षित, पोस्ट ग्रॅज्युएट, पॅकेज १५ लाखांपेक्षा जास्त, मनमिळाऊ, पत्ता : श्री. नितीन कमलाकर कुलकर्णी, ब्लॉक नं. १०४. ए-१, दीपनगर सोसायटी, विजय-ममता टॉकिजसमोर, नाशिक-पुणे रोड, शिवाजीनगर, नाशिक-६. मो. : ९९२२५९०१८५

**प्रांजल दिनेश जोशी**
२६, ५', काश्यप, यजुर्वेदी, गोरा, चष्मा आहे, राक्षस, कन्या, चित्रा, मध्य, दुसरे, A+ve, शिक्षण : M.Com., C.A. Inter, Feelancing Accounting & Taxsation, नोकरी, अपेक्षा : उच्चशिक्षित, सी.ए., इंजिनिअर, पत्ता : श्री. दिनेश दिगंबर जोशी, बी-८, रेणुका रेसिडेन्सी, महिला बँकेसमार, इंदिरानगर, नाशिक. मो. : ९४२२७४८१५०, ९४२३९७०९८२

**पूर्वा मिलिंद चिंचोलिकर**
२६, ५'५'', वशिष्ठ, ऋग्वेदी, गहुर्वण, सौम्य मंगळ, मनुष्य, कन्या, चित्रा, मध्य, O+ve, शिक्षण : B.E. (Product Design), गांधीनगर, अहमदाबाद, मा. प्रा. : ३०,०००/-, अपेक्षा : ग्रॅज्युएट, शाकाहारी, मनमिळाऊ, पत्ता : सौ. स्मिता मिलिंद चिंचोलिकर, रचित सनराईज, तिसरा मजला, नवशा गणपती रोड, गंगापूररोड, नाशिक. मो. : ९८२२०२१५६४, ९८८१७२१५६४

**प्रेषिता महेश पाठक**
२७, ५'५'', भारद्वाज, यजुर्वेदी, देव, कन्या, उत्तरा फाल्गुनी, आद्य, द्वितीय, O+ve, शिक्षण : M.Sc. (Mathematics), MPSC, बँकेच्या परीक्षा देत आहे, अपेक्षा : अपेक्षा : वयातील अंतर १ ते ३ वर्षे, सुस्वभावी, उच्चशिक्षित, पत्ता : डॉ. श्री. महेश श्रीधर पाठक, प्लॉट नं. २६, 'शाश्वत', शाहूनगर, सावेडी, बसस्टॅण्डच्या मागे, सावेडी, अहमदनगर-४१४००३. मो. : ७५०७०४५७०९

**डॉ. प्रांजली रवींद्र कुलकर्णी**
२७, ५'३'', सांख्यायन, यजुर्वेदी, गोरा, निर्दोष मंगळ, राक्षस, वृषभ, कृत्तिका, अंत्य, तृतीया, शिक्षण : M. Path. नोकरी/व्यवसाय : डॉक्टर, अपेक्षा : सुशिक्षित, सुसंस्कृत, अनुरूप, पत्ता : श्री. रवींद्र गोविंदराव कुलकर्णी, गुरुदत्त हौसिंग सोसायटी, कामगार हॉस्पिटलमागे, नेवासा रोड, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर-४१३७०९. मो. : ९४०४९७९९२५, ९४२०४७३०३२

**हर्षदा किरण पंचाक्षरी**
२७, ५', काश्यप, यजुर्वेदी, देव, कर्क, पुष्य, मध्य, तृतीय, B+ve, शिक्षण : B.E. (Mech), नोकरी : Network Infra Project Engineer in MSCL (Skill Mine), मा. प्रा. : ७०,०००/-, अपेक्षा : सुस्वभावी, सुशिक्षित, निर्व्यसनी, अनुरूप, पुणे, नाशिक किंवा परदेशस्थ चालेल, पत्ता : श्री. किरण कमलाकर पंचाक्षरी, एफ-६०३, मेघमल्हार, डी.एस.के. विश्व, सिंहगड रोड, धायरी, पुणे-४११०४१, मो. : ७०५७२६१४२३

**अंजली महेश देशपांडे**
२८, ५'३'', भारद्वाज, यजुर्वेदी, देव, वृश्चिक, भरणी, अंत्य, तिसरे, AB+ve, शिक्षण : B.Tech., नोकरी : Software Engineer, मा. प्रा. : ६५,०००/-, अपेक्षा : उच्चविद्याविभूषित, वेल सेटल, पत्ता : श्री. महेश केदार देशपांडे, प्लॉट नं. ६७, ए विंग, विनायक क्लासिक अपार्टमेंट, पुणे-४११०३०. मो. : ८२३७३९६९६१

**डॉ. गौरी मिलिंद जोशी**
२८, ५', उपमन्यू, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा, आद्य, प्रथम, O+ve, शिक्षण : M.D. (Ayurved), अपेक्षा : सुसंस्कृत, डॉक्टर, उच्चशिक्षित, व्यावसायिक, पत्ता : सौ. कांचन मिलिंद जोशी, बी-८०१, मेरिडियन गोल्ड, कर्मयोगी नगर, लक्ष्मीनारायण हॉस्पिटलमागे, नाशिक-८. मो. : ७५८८११०००६, ८३०८०८९३२०

**मृदुला प्रकाश चंद्रात्रे**
२९, ५'२'', चंद्रात्रे, यजुर्वेदी, वैश्य, राक्षस, वृषभ, कृत्तिका, अंत्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.E. Electrical Engineering, नोकरी : HAL, Ozhar, Nashik. मा.प्रा. : ४०,०००/-, अपेक्षा : इंजिनिअर, सुस्वभावी, उच्चशिक्षित, वेलसेटल, नाशिकमधील हवा. पत्ता : श्री. प्रकाश अंबादास चंद्रात्रे, घ. नं. ४५२१, सुखकर्ता आचारीचाळ, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक. मो. : ९४०३३५४८००, ९६०४६३१७१४

**अनिता पुरुषोत्तम कुलकर्णी**
३२, ५'४'', भारद्वाज, ऋग्वेदी, निमगोरी, राक्षस, मेष, कृत्तिका, अंत्य, पहिले, A+ve, शिक्षण : बी.ए. ऑनर्स, एमएस-सीआयटी, अपेक्षा : उच्चविद्याविभूषित, गौरवर्ण, उत्तम घराणे, चांगली नोकरी, देवधर्माची आवड, पत्ता : श्री. पुरुषोत्तम कृष्णाजी कुलकर्णी, जोशीवाडा, पांडव वाड्याजवळ, एरंडोल, मु. पो. ता. एरंडोल, जि. जळगाव-४२५१०९, मो. : ९८२३९८५२२८, ७६६६०३१२४०

**चित्रा रत्नाकर कुलकर्णी**
३४, ५'२'', वत्स, देशस्थ यजुर्वेदी, देव, मेष, अश्विनी, आद्य, पहिले, B+ve, शिक्षण : MA (Eco.) NET-SET, Practice, अपेक्षा : सुस्थापित, सुशिक्षित, निर्व्यसनी, पत्ता : श्री. रत्नाकर दत्तात्रय कुलकर्णी, पी. के. ढाके प्रगती निवास, आराधना कॉलनी, खलवाडी, भुसावळ. मो. : ९८२३४८२५१८

**प्राजक्ता अनिल मुळे**
३६, ५'१'', चंद्रात्र, यजुर्वेदी, गोरा, मनुष्य, मकर, उत्तराषाढा, अंत्य, दुसरे, B+ve, शिक्षण : B.Com., MBA (Finance), अपेक्षा : MBA, Engineer, अनुरूप, पत्ता : श्री. अनिल भास्कर मुळे, १३६२-एच, मुळे बंगला, जुना आग्रारोड, जुने सीबीएस, नाशिक-४२२००२. मो. : ७५८८३६६८०४, ९५७९३०१७७२

## घटस्फोटित वधू-वर

**साधना सुधीर देशपांडे**
३१, ४'११'', भारद्वाज, ऋग्वेदी, मनुष्य, मिथुन, आर्द्रा, आद्य, तिसरे, A+ve, शिक्षण : M.Com., संगीत विशारद (गायन), अपेक्षा : शुद्ध शाकाहारी, निर्व्यसनी, ऋग्वेदी, मनमिळाऊ, उच्चशिक्षित, पत्ता : श्री. सुधीर विनायकराव देशपांडे, ४०१, क्रिष्णा एमराल्ड, अंबिका कॉलनी, गजानन महाराज मंदिरामागे, वडाळा-पाथर्डी रोड, इंदिरानगर, नाशिक. मो. : ९९२२४४५९५०

**समीर गणेश खंडाळकर**
३४, ५'३'', काश्यप, यजुर्वेदी, निमगोरा, मनुष्य, धनु, पूर्वाषाढा, मध्य, दुसरे, O+ve, शिक्षण : B.E. (Mech.), नोकरी : हैद्राबाद येथे, मा. प्रा. : १६ लाख, अपेक्षा : सुशिक्षित, नोकरी करणारी, मनमिळाऊ, संसार करण्याची तयारी, पत्ता : श्री. गणेश खंडाळकर, फ्लॅट नं. ९०३, सम्राट गोकुळ धाम, हिरावाडी, पंचवटी, नाशिक. मो. : ९८५०५२१४०५

**अनुप्रिता सुरेंद्र घाटपांडे**
३४, ५'३'', अत्री, देशस्थ ऋग्वेदी, निमगोरा, देव, मकर, श्रवण, अंत्य, दुसरे, O+ve, शिक्षण : M.A. (Economics), Ph.D करत आहे. व्यवसाय : पुणे येथे स्वत:चा केटरिंगचा व्यवसाय, मा. प्रा. : ६०,०००/-, पत्ता : श्री. सुरेंद्र भास्कर घाटपांडे, १, व्हिनस हाईट्स फेज -२, बाणेर, सूस रोड, बाणेर, पुणे-४११०४५. मो. : ९४२२२७४६६५

**अनुजा चंद्रशेखर कुलकर्णी**
३४, ५'६'', कौशिक, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा, आद्य, पहिले, B+ve, शिक्षण : Master of Pharmacy, Diploma in IPR, नोकरी : सरकारी बँकेत मॅनेजर, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : सरकारी बँकेत/सरकारी नोकरी, मुलीला सन्मानाने, प्रेमाने समजून घेणारे, मुलगी कोणत्याही परिस्थितीत नोकरी सोडणार नाही. (नाशिक, पुणे, मुंबई फक्त) पत्ता : श्री. चंद्रशेखर वसंत कुलकर्णी, संचेती इस्टेट, सावरकर नगर, गंगापूररोड, नाशिक-१३. मो. : ९९७५४०६८१६

**अमोघ चामराज राव**
३९, ५'११'', विश्वामित्र, कानडी, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा आद्य, चवथे, O+ve, शिक्षण : MCM, Pune, नोकरी : Indusind Bank, Turbhe, Navi Mumbai, मा. प्रा. : ७०,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी, अनुरूप, पत्ता : श्री. चामराज अतुर राव, १०३, इंद्रलोक को-ऑप. हौसिंग सोसायटी, स्वामी नित्यानंद रोड, सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल समोर, पनवेल-४१०२०६. मो. : ९५९४०४६९३४, ८१६९८६१८१४

**वृषाली हेमवंत कुलकर्णी**
३९, ६'२'', पाराशर, ऋग्वेदी, मनुष्य, मेष, भरणी, मध्य, पहिले, A+ve, शिक्षण : Diploma in Eduction (D.Ed.), नोकरी : प्राथमिक शिक्षिका, मा. प्रा. : ८०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. हेमवंत विनायक कुलकर्णी, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा-४१२८०१. मो. : ९८२२९४९६८४, ८८०५८३१०१६

**ॲड. मनीषा रवींद्र मेहेता**
४५, ५'२'', पंजाबी ब्राह्मण, मोहोयाल, राक्षस, मेष, आश्लेषा, अंत्य, दुसरे, B+ve, शिक्षण : B.A.LLB, DTL, व्यवसाय : जिल्हा न्यायालय येथे वकिली, मा. प्रा. : १ लाख, अपेक्षा : सुसंस्कृत, सांपत्तिकस्थिती उत्तम, अपत्य चालेल, पत्ता : श्री. रवींद्र मेहता, सुनील वसंत प्रदक्षिणे, ४, राजगृही अपार्टमेंट, रामायण बंगल्यामागे, टिळकवाडी, नाशिक. मो. : ९८५०५६५६५८, ७०२०८५१६८८

**जगदीश पद्माकर खोडके**
५०, ५'५'', काश्यप, यजुर्वेदी, गोरा, देव, मकर, उत्तराषाढा, अंत्य, चौथे, O+ve, शिक्षण : एम.ए., अपेक्षा : सुस्वभावी, अनुरूप, पत्ता : श्रीमती पद्मावती पद्माकर खोडके, ११/५, ऋषिराज सोसायटी, न्यूजपेपर एजन्सी समोर, नरसिंहनगर, गंगापूरोड, नाशिक. मो. : ९८५०९५७६२४

**निलेश उपेंद्र पोळ**
५१, ५'६'', काश्यप, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा, आद्य, सौम्य मंगळ, दुसरे, A+ve, शिक्षण : B.Sc., (Chemistry), D. Pharm, व्यवसाय : मेडिकल स्टोअर्स पार्टनरशिप, मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षा : अनुरुप, सुस्वभावी, मनमिळाऊ, सर्वांना सांभाळून घेणारी. पत्ता : श्री. उपेंद्र भालचंद्र पोळ, प्लॉट नं. ११, अथर्व बंगला, गोरक्ष नगर, आर.टी.ओ. कॉर्नर, दिंडोरी रोड, नाशिक. मो. : ९१४६७०७९२९, ९०७५४३९१४९



# परमहंस योगी श्री नरसिंग गोपालदास महाराज

सुधीर करंजीकर, नाशिक.

श्रीक्षेत्र नाशिक ही अनेक ऋषी संत महंतांची तपोभूमी होती. पवित्र गोदामाईच्या काठावर वसलेले हे तिर्थक्षेत्र. पंचवटीतील श्री काळाराम मंदिरातील प्रभु श्रीराम, सीता व लक्ष्मण यांचे दर्शन घेतल्यानंतर सभामंडपातील हनुमानाचे दर्शन घेत असतांना पूर्व दरवाजातील ओवरीत असलेले परमहंस योगी श्री नरसिंग तथा गोपालदास महाराजांचे मंदिर नजरेस येते.

श्री नरसिंग तथा गोपालदास महाराजांचा पूर्व इतिहास अज्ञात आहे. श्री गजानन विजय ग्रंथ, अध्याय ११ वा तसेच श्री साईचरित्र अध्याय ३३ मध्ये महंत गोपालदास महाराजांचा केलेला उल्लेख वाचण्यात येतो.

गोदाकाठी भाटे धर्मशाळेच्या मागील आळवांच्या बागेतील चिखलात महाराज सर्वांच्या सहवासात पहुडलेले असायचे. विलक्षण तेज लाभलेले महाराज विदेही अवस्थेत असत. ते अतिशय उच्चकोटीचे साधु पुरूष होते. नांदगावकर या अध्यात्मातील अधिकारी व्यक्तीला महाराजांच्या दिव्यत्त्वाची कल्पना आली व त्यांनी अनुयायांसह केलेल्या प्रार्थनेनुसार महाराज श्री काळाराम मंदिरातील पूर्व दरवाजातील ओवरीत वास्तव्यास आले व तेथेच सत्तावीस वर्षे धुनी पेटवून राहिले.

महाराज अतिशय कमी बोलत. 'ओम नृसिंह' नामाचा ते अखंड जप करीत. त्यांनी ध्यान देवतेचे अधिष्ठान ते जेथे बसत असत तेथील खांबातच निश्चित केले होते. या खांबास ते कोणालाही शिवू अगर टेकू देत नसत. त्यांना भोजन करतांना सहसा कोणीही पाहिले नाही. शिर्डीचे साईबाबा, शेगांवचे संत गजानन महाराज, चित्रकुट येथील श्री माधवनाथ महाराज, तसेच पलूसचे श्री धुंडीराज महाराज यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. हे पंचायतन शरीरे भिन्न, पण आत्मा एक असे होते. शेगावच्या गजानन महाराजांचा उल्लेख महाराज बंधू असा करीत. योगाभ्यानंद श्री माधवनाथ महाराजांचे प्रतिवर्षी निवृत्ती एकादशी त्र्यंबकेश्वर वारीनिमित्ताने नाशिकला येणे व्हायचे. श्रीनाथ महाराज व गोपालदास महाराजांचे भेटीदरम्यान कधी दंड थोपटणे, कधी मुखावाटे मोठा आवाज काढणे, तर कधी कडकडून भेटून उड्या मारणे चालायचे. पुष्कळदा हे महात्माद्वय मंदिरापासून गंगेपलिकडील दूर टेकडीवर जात. तेथील पवित्र गुप्त स्थानांवर उभयतांचे बोलणे व्हायचे. अर्थात हे सांकेतिक बोलणे कोणालाही कळले नाही. श्रीनाथ महाराज गोपालदास महाराजांच्या समवेत पंचवटी परिसरात तांग्यातून फेरफटका मारीत. सिन्नरजवळील मौजे पांगरी बु.।। येथील मल्हारदादा रत्नपारखी व मथुराबाई हे सद्गुरु माधवनाथ महाराजांचे जनक-जननी होते.

महंत गोपालदास महाराजांना अनुग्रहित शिष्य फारसे नव्हते. दामोदर चिटणीस, तात्यासाहेब वानवळे, वासुदेव थत्ते, भाऊसाहेब कर्डिले, दत्तोपंत चाफेकर, महादेव वैद्य यांसारखी मान्यवर मंडळी महाराजांची भक्त होती. श्री गजानन महाराज गुप्ते, रामानंद बिडकर महाराज तसेच आत्मज्ञानी योगी दादासाहेब चिटणीस महाराजांना त्यांचा सहवास व आशीर्वाद लाभले होते.

सुरदास नावाचे सद्गृहस्थ महाराजांच्या सेवेत असत. महाराज आपली गादी सोडून बाहेरगावी फारसे जात नसत. भाविकांवर कृपादृष्टी ठेवून त्यांच्या इच्छेचे फळ त्यांच्या पदरात टाकणे हेच त्यांचे अधिकार व सत्तेचे द्योतक होते. पशु-पक्षांवर महाराज प्रेम करीत. निर्भयपणे ते महाराजांच्या जवळ वावरत.

संतांचे जीवन अथांग सागराप्रमाणे असते. अवतारकार्य पूर्ण होताच १३ फेब्रुवारी १९२०, माघ वद्य दासनवमीच्या दिवशी पहाटे ब्रह्ममुहूर्तावर काळाराम मंदिराच्या पूर्व दरवाजातील ओवरीत महाराज ब्रह्मलीन झाले. याप्रसंगी श्रीनाथ महाराज उपस्थित होते. गोदाकाठी म्हसोबा पटांगण येथील लक्ष्मण रेषा वाघाडी, गोदावरी व सरस्वती या त्रिवेणी संगमावरील जागेत महाराजांचे संजीवन समाधी मंदिर आहे. नरसिंग महाराज सेवा मंडळाने सन २००४मध्ये येथे भव्य संजीवन समाधी मंदिर उभारले आहे. परम पूजनीय विश्वात्मक सद्गुरु जंगलीदास महाराजांनी या स्थानाचे महत्त्व सांगितले आहे. दासनवमी, गुढीपाडवा, गुरूपौर्णिमा, नवरात्र, अष्टमी होम, दीपोत्सव, छप्पन भोग, आंबा महोत्सव आदी कार्यक्रम मोठ्या भक्तीभावाने साजरे होतात. येत्या दि. ८ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२६ या काळात महाराजांचा १०६ वा संजीवन समाधी उत्सव साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गोदामाईच्या साक्षीने होणाऱ्या या उत्सव सोहळ्यात आपण सारे सहभागी होऊन पारमार्थिक आनंदाची अनुभुती घेऊ या! ओम गुरूदेव!

(संदर्भ : पूजनीय दास भार्गव महाराज रचित 'श्री गजानन महाराज चरित्रकोष')

**सभासद बंधू - भगिनींना नम्र विनंती -** कृपया आपल्या भ्रमणध्वनीमध्ये संस्थेचा भ्रमणध्वनी क्र. ९३७३०९६६८९ जतन करावा म्हणजे देशस्थ ऋग्वेदी पत्रिकेची PDF file दरमहा सहज मिळू शकेल. आपल्या भ्रमणध्वनी क्रमांकाची नोंद संस्थेकडे केली नसल्यास त्वरीत करून घ्यावी.





## देशस्थ ऋग्वेदी संस्था नाशिक



**श्री दुर्गा मंगल कार्यालय, तिळभांडेश्वर लेन, नाशिक**

* वधु-वर सुचक केंद्र * अद्ययावत वेबसाईट * ऑनलाईन नोंदणी व पैसे भरण्याची सुविधा * दोन सुशोभित हॉल * गोदाघाटापासुन जवळ * बॅटरी बॅकअप * वर्षश्राध्द, १३ व्यासाठी देखील हॉल उपलब्ध

**ऋग्वेद सभागृह तिडके कॉलनी, बाजीराव नगर**

* ५००० स्क्वे. फुटांचे २ भव्य हॉल.
* लिफ्टची व्यवस्था * जनरेटर बॅकअप
* ॲटॅच टॉयलेट बाथरूमसह रुम्स

**संस्थेचे उपक्रम**

* ज्ञातीतील विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी
* निराधारांना आधार पेन्शन योजना
* देणगीदारांच्या व्याजातून विद्यार्थ्यांना पारितोषिके
* शैक्षणिक मदत * वैद्यकिय मदत
* विविध धार्मिक उपक्रम

**ऋग्वेद ए.सी. बॅन्क्वेट हॉल**

विवाह, मौजी, साखरपुडा, डोहाळे जेवण, बारसे, एकसष्टी, अमृतमहोत्सव, सम्मेलने, स्वागत समारंभ इ.साठी उपलब्ध

* बुकींगसाठी संपर्क : ०२५३-२५९६४३६

Web : www.drbsnashik.in | Email : drbs2011@gmail.com


## * भावपूर्ण आदरांजली *

**कै. श्रीकांत रामचंद्र नाशिककर**



देशस्थ ऋग्वेदी संस्थेचे जेष्ठ सभासद श्री. श्रीकांत रामचंद्र नाशिककर (गुरुजी) (वय ७६) यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. ते उत्तम वैदिक ब्राह्मण होते. आपल्या युवकशाखेचे माजी सहकार्याध्यक्ष श्री. सारंग नासिककर यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.

**कै. वासुदेव दशपुत्रे**



नाशिकच्या सांस्कृतिक क्षेत्राची जडणघडण करणारे ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व वासुदेव ऊर्फ नाना दशपुत्रे (८७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातील संस्थांची एक मध्यवर्ती संस्था नाशिक शहर सांस्कृतिक महामंडळाची स्थापना करून कलावंतांची फळी उभी करत नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळवून दिले. स्वतःही अनेक नाटकांमध्ये भूमिका केल्या. सन २००८-१२ सार्वजनिक वाचनालयाच्या उपाध्यक्षपदी राहिले. त्यांच्या जाण्याने अनेकांचा एक उत्तम मार्गदर्शक दुरावल्याची भावना सांस्कृतिक क्षेत्रातील मंडळींनी व्यक्त केली आहे. त्यांच्या पश्चात दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

**कै. उत्तम दामोदर दशपुत्रे**



देशस्थ ऋग्वेदी संस्थेचे आजीव सदस्य श्री. उत्तम दामोदर दशपुत्रे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा दोन विवाहित कन्या जावई व नातवंडे असा परिवार आहे.

**देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!**

**देशस्थ ऋग्वेदी संस्थेचे आजीव सभासद होऊन संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये सामिल व्हा! सामाजिक उपक्रमांमध्ये आपला सहभाग नोंदवा!**

हे पत्रक संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुहास पाटील यांनी विकास प्रिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा. लि., प्लॉट क्र. ३२, सातपूर औद्योगिक वसाहत, त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक-७ येथे मुद्रित करून श्री. दुर्गा मंगल कार्यालय, तीळभांडेश्वर लेन, नाशिक-४२२००१ येथे प्रसिद्ध केले. स्वामित्व: देशस्थ ऋग्वेदी संस्था, नाशिक, दूरध्वनी : ०२५३-२५९६४३६. संस्थापक : कै. मधुकर कुलकर्णी
अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेखांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.